# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. ०३/०१/२००७

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक ०३/०१/२००७ रोजी सभा सुचना क्र. २४ दि. २८/१२/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ५) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ६) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ७) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ८) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ९) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १०) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ११) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| १२) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| १३) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| १४) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| १५) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १६) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग यांचे मी हार्दिक स्वागत करतो व सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देतो. हे नवीन वर्ष आपण सर्वांना सुखाचे, समृद्धीचे व भरभराटीचे जावो हीच सदिच्छा. धन्यवाद.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १५८ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

पान क्र. ४ पहिलाच माझा पॅरा आहे. खालून दुसरी लाईन, जेवण करुन आणायला सांगा. यायला सांगा नाही. पान क्र. २६ वर रू.१११/- कोटी लिहिले आहेत तिथे रु. ११८/- पाहिजे पान क्र. ३१ वर माझाच पॅरेग्राफ आहे. ओस्तवाल पार्क ते राहूल पार्क या रस्यावर आर. व्ही. तळवणेकर असे पाहीजे.

(सन्मा. सदस्य श्री. रविंद्र माळी ह्यांनी प्रकरण क्र.१५८ च्याठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**परशुराम म्हात्रे :-**

त्याला माझे अनुमोदन आहे.

**रोहीदास पाटील :-**

मा. सभापती महोदय, याच्यावर माझी सुचना आहे. आत्ता आपण हे आठव्या आणि नवव्या महिन्यातील स्थायी समितीचे इतिवृत्त आले आहे. माझी मा. सचिवांना, मा. सभापतींना व मा. आयुक्तांना विनंती आहे की, आत्ता कमी काळ राहिलेला आहे. स्थायी समितीचे इतिवृत्तांत मंजुर करुन घेता येईल इतके ते काम करुन घ्यायला पाहिजे. पुढे ते तांत्रिक काम नको. आपली आज सभा झाली तर पंधरा दिवसांनी पुढच्या सभेला म्हणजे एक सभा सोडून पुढच्या सभेला इतिवृत्तांत मंजुरीला यायला पहिजे. नाहीतर नंतर तांत्रिक अडचणी येतील. आपण मा. सभापती, मा. आयुक्त आणि मा. सचिव यांना विनंती करतो की, आत्ता नवव्या महिन्यातील इतिवृत्त आले. पुढे तांत्रिक अडचणी येउ नये म्हणून जशी आत्ता पुढची मिटींग लागेल तर तीन ते चार सभेचे इतिवृत्त तुम्ही एकत्र घ्या.

**नगरसचिव :-**

तीन केलेल आहेत. तीन ते चार येतील.

**रोहीदास पाटील :-**

तीन ते चार करा आणि साधारणतः इतका पायंडा पाडा की, आज सभा झाली तर पुढच्या सभेला नको पण त्याच्या पुढच्या सभेला इतिवृत्तांत मंजुर होईल असे ठेवा. म्हणजे अधिका-यांनाही तांत्रिक अडचणी नको. आता मी परवा दिवशी खांबितसाहेबांकडे गेलो की, साहेब ते काम केले की नाही. तर त्याचे इतिवृत्त मंजुर झाले नाही. मी तिथे आर्ग्युमेंट केले नाही पण ते लगेच उत्तर देवुन मोकळे होतात. वादाचा विषय नाही पण तो अडचणीचा विषय होईल. तर आत्ता पुढच्या वेळेला गती द्या.

**नगरसचिव :-**

पुढच्या वेळेला तिन्ही येतील.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील त्यांनी जी सुचना मांडली, त्याप्रमाणे मी अशी सुचना मांडलेली. त्याप्रमाणे नाही तर तुम्ही पुढच्या वेळेला येतील म्हणजे दोन दोन आलेले आहेत. मागील सभेला इतिवृत्तांत नव्हते. आणि आत्ता दोन आले आहेत. सन्मा. सदस्या श्री. रोहिदास पाटील यांनी सांगितले की, पंधरा दिवसांनी इतिवृत्तांत द्यावे ते योग्य आहे.

**प्रकरण क्र. १५८:-**

दि. ३१/०८/२००६ व दि. २७/०९/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १६१ :-**

दि. ३१/०८/२००६ व दि. २७/०९/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. रविंद्र माळी.**　　　　**अनुमोदन :- श्री. परशुराम म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही /-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १५९ चे वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

मा. सभापती महोदय, गेल्या स्थायी समितीच्या टर्ममध्ये, सोळा नगरसेवकांच्या माध्यमातून दोन-दोन क्लार्क ठेका पद्धतीने घ्यायचे असे शासनाने मंजुर केले होते. आणि तशी त्यांची भरती आपण केली होती. साधारण सहा महिने आपल्या महापालिकेत कर्मचारी म्हणून होते. परंतु, कालपासुन त्यांना प्रशासनाने नोटीस दिलेल्या आहेत. त्यासंबंधी जरा माहिती मिळावी.

**मा. सभापती :-**

मा. उपायुक्त साहेब, आपण जरा माहिती द्यावी.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.)सो.) :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील ह्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने माहिती देवु इच्छितो शहरामध्ये समान कर आकारणीचा मुद्दा गेल्या चार-पाच वर्षापासुन प्रलंबित होता आणि त्या काळामध्ये मा. महासभेचा व मा. स्थायी समिती सभेचा आग्रह होती की, ते काम मुदतीत पूर्ण करुन नागरिकांना न्याय द्यावा व तत्कालीन मा. स्थायी समितीने मान्यता दिल्याप्रमाणे मा. आयुक्तांच्या परवानगीने आपण पन्नास लिपिक घेतलेले होते. आणि त्यांची मुदत संपलेली होती. मागील सभेमध्ये मा. स्थायी समितीने पुनःश्च शंभर लिपिक घेण्यासाठी व जे कार्यरत पन्नास लिपिक आहेत ते पुढील निविदा पूर्ण होईपर्यंत मुदतवाढ देण्याची मान्यता दिली होती. त्या अनुषंगाने आवश्यक तो प्रस्ताव मा. आयुक्त साहेबांकडे सादर केला होता. त्यामध्ये मा. आयुक्त साहेबांशी आमची सर्वांची चर्चा झाली. आणि आता तो कामाचा जो उद्देश आहे तो पूर्ण झालेला आहे. नव्याने आज तेवढी मोठी गरज आहे का? त्यामुळे पुढील मुदतवाढ प्रशासकीय स्वरूपात त्याला मिळालेली नाही. त्या अनुषंगाने वस्तूस्थिती जाणून घेण्यासाठी मा. आयुक्त साहेबांनी आज ह्या सभेच्या नंतर सर्व विभागप्रमुखांची एक बैठक आयोजित केलेली आहे. मा. सभापती आणि इतर सन्मा. सदस्य काल मा. आयुक्त महोदयांना भेटलेले होते व पुढील निर्णय झाल्यानंतर यावर रितसर कार्यवाही केली जाईल.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्तांना आमची विनंती राहील की, आत्ता ज्याप्रमाणे कामाचा पसारा वाढत चाललेला आहे. वाढती वस्ती, वाढती खाती, वाढत्या लोकांच्या अपेक्षा किंवा हे कामकाज अजूनही आम्हाला दिसते तेवढे की, आपल्या खात्याकडून किंवा कोणतेही खाते असू द्या, बांधकाम खाते असू द्या, आरोग्य खाते असू द्या, त्यांच्याकडून नगरसेवकांना पत्र मिळायची आहेत ती पत्रे नागरिकांना मिळत नाही. नागरिकांना जी उत्तरे मिळायची आहेत ती उत्तरे नागरिकांना मिळत नाही. काही संस्था लेखी जे काही उत्तर मागतात त्याचेही उत्तर

मिळत नाही. अशा कामावर असलेल्या दिडशे माणसांची जर आपण आवश्यकता नाही असे सांगितले तर तो कुठेतरी गैरसमज होईल किंवा चुकीची माहिती होईल. असे आम्हाला वाटते. हे स्वतः मला वाटते. स्थायी समितीलासुद्धा तेच वाटायला पाहिजे. ह्याच्यात चुक काही नाही. एवढी माणसे जर आपण प्रशासनातून, कामकाजातून बाहेर काढली तर आजही अनेक गोष्टींचे म्हणजे व्हिजीट द्यायची आहे, जाऊ शकत नाही. उत्तर द्यायचे आहे देऊ शकत नाही, दिडशे माणसे आपण क्लेरिकलमधून बाहेर काढली तर कसे चालेल? तुमच्याकडे रिपोर्टींग केलेले? खाते वाईज आले की कसे काय आले हे आम्हाला समजत नाही. पण हे अजिबात न पटण्यासारखे आहे. ठिक आहे, तुम्ही तो निर्णय कायम केला असेल असेही नाही, त्याला एखाद्या दिवसाचा ब्रेक असेल तर तसा विषय वेगळा. पण ती माणसेच नको असतील असे असेल तर तो चिंतेचा विषय होईल.

**जयंत पाटील :-**

साहेब, खातेप्रमुखांची जी सभा आपण घेणार आहात ती सभा झाल्यानंतर आपण आंम्हाला सांगणार आहात का? खातेप्रमुखांची ह्या सभेनंतर आपली सभा होणार आहे. खातेनिहाय आपण विचारणा करणार आणि हे ते आपण पन्नास लोक काढले. माझ्या माहितीप्रमाणे पन्नासपेक्षा जास्त भरती केले होते. भरती किती केले होते?

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.)सो.) :-**

पन्नास.

**जयंत पाटील :-**

माझ्या माहितीप्रमाणे जास्त आहेत. आमचा अंदाज बासष्ट आहे. साहेब, नक्की विचारुन घ्या आणि काढले किती? मी मा. सभापतींना विनंती करतो की, साहेबांनी सभा घ्यावी तोपर्यंत ही सभा तहकुब करावी आणि तुम्ही आम्हाला निर्णय सांगावा.

**मा. सभापती :-**

ही सभा पाच मिनीटांसाठी तहकुब करण्यात येत आहे.

(सकाळी ११.३० वा. सभा तहकुब करण्यात आली.)

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, सभा संपल्यानंतर विभागप्रमुखांची सभा घेउुन नंतर आपल्याला कळवणार आहेत. आणि मा. सभापती साहेबांनी मला तहकुब मागे घेण्यासाठी त्याकारणाने सांगितले त्यामुळे मी माझी तहकुबी मागे घेतो.

**मा. सभापती :-**

सभेला सुरुवात करावी.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १५९ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, जर आपली परवानगी असेल तर सभा सुरू होण्यापुर्वी मी एक विषय मांडू इच्छितो. आपली महापालिका हि 'ड' वर्गाची आहे आणि आपल्याला दोनच उपायुक्त मंजुरी आहे. आपल्या महापालिकेत तीन उपायुक्त आहेत. यासंबंधी मा. आयुक्तंच्या नावे व आपल्यालासुद्धा मी पत्र दिलेले आहे. त्याच्यावर खुलासा करावा. कारण आपण आत्ता जे पन्नास कर्मचारी आहेत त्यांना थांबवलेले आहे. तर एक उपायुक्त एक्स्ट्रा आहे त्याच्याबद्दल काय? याचा खुलासापण मला दिला नाही आणि पत्रव्यवहार पण दिलेला नाही. पत्राने उत्तर द्यायला पाहिजे होते.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्तसाहेब, याच्याबद्दल जरा खुलासा करा.

**मा. उपायुक्त (मुख्यालय)सो :-**

सन्मा. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने खुलासा देण्यात येतो. आपले उत्तर दोन दिवसामध्ये आपल्याला मिळेल. शासनाने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर तीन उपायुक्त मंजुर केलेले आहेत. आणि त्याप्रमाणे दोन प्रतिनियुक्तीवर आणि एक महानगरपालिकेने भरलेला आहे दरम्यानच्या काळात तद्नंतर शासनाने महाराष्ट्राच्या महानगरपालिकांचे अ, ब, क, ड असे वर्गीकरण केलेले आहे. आपली महापालिका 'ड' वर्गामध्ये समाविष्ट झालेली आहे. आणि 'ड' वर्गाच्या महापलिकेचा प्रशासकिय आकृतीबंध कसा असावा त्यामध्ये सर्व संवर्ग पदांचा उल्लेख केलेला आहे. त्यामध्ये आपण नमुद केल्याप्रमाणे उपायुक्तांचाही आहे. आणि 'ड' वर्ग महापालिकेला दोन उपायुक्त असावेत असे त्यामध्ये नमुद आहे. पण ह्यापुर्वी जास्तीचे उपायुक्त मंजुर असतील आणि ते कार्यरत असतील त्यांचा सेवाकाळ पुर्ण झाल्यानंतर ती पदे आपोआप लॅप्स होतील असा त्या परिपत्रकामध्ये उल्लेख आहे. तर त्या सेवा संपुष्टात आल्यानंतर नव्याने उपायुक्त प्रतिनियुक्तीवर राज्य शासनाकडून पाठविला जाणार नाही.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, मी तुमच्याशी सहमत आहे. पण ते परिपत्रक कोणत्या वर्षाचे आहे?

**मा. उपायुक्त (मुख्यालय) सो. :-**

ह्या वर्षाचे आहे.

**शशिकांत भोईर :-**

चालू वर्षाचे आहे की २००५ चे आहे ते नक्की बघा.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

म्हणजे हा वर्गीकरणाचा निर्णय ज्या परिपत्रकाने झाला त्या परिपत्रकात ती तरतुद आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, परिपत्रक हे २००५ चे आणि आपल्याला मध्यंतरी श्री. रणखांब म्हणून उपायुक्त होते. त्यानंतर दुसरे उपायुक्त होते. त्यांची सेवा पूर्ण झाल्यानंतर प्रतिनियुक्तीवर त्यांची बदली दुस-या ठिकाणी झाली. तद्‌नंतर परिपत्रक आले की, त्याच्या अगोदर आले याचा खुलासा करावा. नाहीतर, आपण आपल्या महापालिकेने त्या परिपत्रकाचे उल्लंघन केले असे होईल.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

महापालिकेच्या परिपत्रकात महापालिका उल्लंघन नाही करत.

**शशिकांत भोईर :-**

मग कोण करते? २००५ चे परिपत्रक आहे.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

उपायुक्तांची नियुक्ती राज्य शासन करते.

**शशिकांत भोईर :-**

आपण आस्थापना विभागातून ते परिपत्रक मागवावे. आणि सभागृहाला त्याची वाचून माहिती द्यावी.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

महापालिकेने एका उपायुक्ताची नियुक्ती ते परिपत्रक निघण्याच्या पूर्वीच केली होती.

**शशिकांत भोईर :-**

बरोबर आहे. मी आपल्याशी सहमत आहे. पण परिपत्रक नंतर आले ना. तरी आपल्याकडे श्री. रणखांब हे उपायुक्त असताना त्यावेळीही तीनच उपायुक्त होते. तर त्यांची इथून प्रतिनियुक्तीवर दुस-या ठिकाणी नियुक्ती झाली. तद्‌नंतर आपण दोनच ठेवायचा पाहिजे होते.

**मा.उपायुक्त (मु.) सो. :-**

एका उपायुक्तांना राज्य शासनाकडे पाठवायचे असे आहे का?

**शशिकांत भोईर :-**

नाही.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

तशी आपली धारणा असेल तर आपण त्याप्रमाणे निर्देशित करा.

**शशिकांत भोईर :-**

धारणा नाही. मी हे विचारतो की, परिपत्रक आपले काय बोलते त्याची सभागृहाला माहिती द्या.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

ते परिपत्रक सर्व सन्मा. सदस्यांना पुरविले जाईल.

**शशिकांत भोईर :-**

पुरवायला नको. त्याचे वाचन करा. सभागृहाला माहिती दिली तर बरे होईल ना.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

मागवून घेतो.

**शशिकांत भोईर :-**

सभागृह त्याचा निर्णय घेईल, काय करायचे ते.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

राज्य शासनाची जी बाब असते, मला वाटत नाही की, आपण त्याची इथे चर्चा करावी.

**शशिकांत भोईर :-**

त्यांच्या परिपत्रकानुसार आपण अंमलबजावणी करतो.

**जयंत पाटील :-**

राज्य शासनाचे परिपत्रक एवढे गुप्त आहे का? ती माहिती स्थायी समितीला मिळायला पाहिजे.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

उपायुक्तांच्या नियुक्तीचे अधिकार आपले नाहीत. ते राज्य शासनाचे आहेत.

**जयंत पाटील :-**

साहेब, आम्ही अधिकार विचारतच नाही. ते विचारतात की, शासनाने जे परिपत्रक काढलेले आहे त्याप्रमाणे आहे का?

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

जे आहे ते २००६ चे आहे.

**शशिकांत भोईर :-**

मग वाचा ना. २००५ चे आहे का? माझ्याकडे २००५ चे परिपत्रक आहे. म्हणून तुम्हाला सांगतो. मी आत्ता आणलेले नाही. मा. सभापती साहेब, या परिपत्रकाची छायांकित प्रत मला मिळावी आणि माझ्याकडे जे परिपत्रक आहे त्याची छायांकित प्रत मी मिळवतो.

**मा. आयुक्त :-**

आपल्याकडे जे २००५ चे आपण म्हणता त्याची एक कॉपी द्या.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, दि. २२/१२ च्या सभेमध्ये मी मा. आयुक्तांना काही माहिती विचारली होती. तर आपण बोलतात. की, सभा संपल्यावर माहिती देतो. पण आपण ताबडतोब निघून गेलात. ती माहिती आपण आत्ता मला देउ शकाल का?

**मा. आयुक्त :-**

अजेंड्यावरचे विषय संपू द्या त्यानंतर मी आपल्याला विषय संपल्यावर माहिती देतो.

**जयंत पाटील :-**

अजेंड्यावरचा विषय नसला तरी महत्त्वाचा विषय आहे. मला तुम्ही माहिती द्या नगररचना प्रमुख घेवारे साहेब सुट्टीवरून आले का? ते आपल्याकडून कायदेशिर सुट्टी घेउन गेले होते का?

**मा. आयुक्त :-**

हो. सुट्टी घेतली होती.

**जयंत पाटील :-**

त्यांची ०९/०९/२००६ ला मुदत संपलेली आहे. जवळ जवळ चार महिने होतील ते आपले कर्मचारी पण नाहीत आणि प्रतिनियुक्तीवर पण नाहीत. मग त्यांनी आपल्याकडून कायदेशिर सुट्टी कशी घेतली, जर आपले ते कर्मचारी नसतील तर? ती त्यांची घेतलेली सुट्टी वैध ठरते का? मुळात ते आपले कर्मचारीच नाहीत.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या संदर्भामध्ये मी खुलासा करु इच्छितो करु इच्छितो की, घेवारेंच्या बाबतीमध्ये मागच्या सभेमध्ये सुध्दा हा प्रश्न विचारण्यात आला होता. आणि तेव्हाही मी सभागृहाला माहिती दिली होती की, त्यांचा जो प्रस्ताव आहे, तो प्रस्ताव आपण शासनाकडे पाठविलेला आहे. आणि महापालिकेनेच जे आपल्याला ए.डी.टी.पी. चे पद भरायचे होते त्याच्यासाठी जी काही जाहिरात वगैरे प्रसिध्द केली होती. त्या जाहिरातीवरुन आलेल्या अर्जांवरती आपण निर्णय घेतलेला होता. निवड समितीने त्याच्यावर निर्णय घेतला होता, त्याला मा. महासभेची मंजूरी मिळाली होती. आणि महासभेची मंजूरी मिळाल्यानंतर तो प्रस्ताव संबंधित खातेप्रमुखांकडे पाठवला होता. त्याला अजूनपर्यंत मंजूरी मिळालेली नाही. मिनव्हाईल, त्यांची जी प्रतिनियुक्ती होती, ती प्रतिनियुक्ती सन्मा. सदस्यांनी निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे एक वर्षाची होती आणि एका वर्षाची प्रतिनियुक्ती संपल्यानंतर त्यांना एकतर मुदतवाढ मिळायला हवी होती. आणि तशा प्रकारची शासनाकडून मुदतवाढ अजूनपर्यंत मिळालेली नाही. परंतु, त्यांच्या नेमणुकीचा हा जो प्रस्ताव आहे, तो प्रस्ताव आपण डायरेक्टर ऑफ टाउन प्लॅनिंग डिपार्टमेंटला पाठवला. ह्या संदर्भामध्ये मा. महासभेने जो ठराव पारित केलेला होता त्याप्रमाणे तो प्रस्ताव त्यांच्या वरिष्ठांकडे पाठवण्यात आला. डायरेक्टर ऑफ टाउन प्लॅनिंगकडे प्रस्ताव पाठवल्यानंतर डायरेक्टर ऑफ टाउन प्लॅनिंगकडून त्याबाबतीमध्ये कुठल्याही प्रकारच्या सुचना आपल्याला प्राप्त झालेल्या नाहीत. मिनव्हाईल, त्यांची जी प्रतिनियुक्तीची मुदत होती ती मुदत संपल्यानंतर खरं अपेक्षित असे होते की, त्यांची जी मुदत संपलेली आहे त्या मुदतीनंतर शासनाने त्यांना एकतर मुदतवाढ द्यायला पाहिजे होती. आणि तशा प्रकारची मुदतवाढ आपल्याकडे आलेली नाही. परंतु, आपल्या लक्षात आल्यानंतर आपण शासनाला तसे पत्र पाठवले होते. आणि महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या शर्तीच्या बाबतीमध्ये कायद्यामध्ये जी काही तरतुद आहे. त्या कायद्यातील तरतुदीचे मी वाचन करतो.

(मा. आयुक्तांनी सेक्शन ४५ चे वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

साहेब, प्रश्न असा आहे, शासनाने त्यांना प्रतिनियुक्तीवर पाठवतांना एक मुदत घालून दिली. ०९/०९/२००६ पर्यंत तुमची मुदत इकडे राहील. ती मुदत त्यांची संपली. नियमाप्रमाणे महापालिकेने ठराव पाठवला. शासनाने मंजूरी द्यायची किंवा नाही द्यायची तो शासनाचा प्रश्न आहे. ठराव हा आपला नियम आहे. शासनाने मंजूरी दिली नाही तर त्या पदावर राहायला ते वैध नाही. ते राहू शकत नाहीत. त्याच्यामुळे ह्या चार महिन्यामध्ये त्यांनी या महापालिकेत ज्या ज्या गोष्टी केलेल्या, मग ते प्लॅन पास केले असतील, टी.डी.आर.चे सर्टीफिकेट दिले असतील, टी.डी.आर पास केले असतील. तर त्या गोष्टी वैध ठरतील का?

**मा. सभापती :-**

सभा पाच मिनिटांनी तहकूब करतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपण जो कलम सांगितला, तो कलम मुळातच लागू होत नाही. तो कलम फक्त शहर अभियंता, उपायुक्त, नगरसचिव ह्यांच्यासाठी लागू होतो. नियामामध्ये दिलेले आहे, की महानगरपालिका

वेळोवेळी राज्य शासनाच्या मान्यतेने नगरपालिका उपायुक्तांनी एक जागा किंवा नगरपालिका सहाय्यक आयुक्तांची एक जागा किंवा तिला आवश्यक वाटतील इतक्या अशा जागा निर्माण करता येतील. म्हणजे ही एक्स्ट्रा जागा आहे.

**मा. आयुक्त :-**

आपल्याकडे ए.डी.टी.पी. ची पोस्टसुद्धा आपण क्रिएट केलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण साहेब, तुम्ही गेल्या मिटींगला असे सांगितले होते की, राज्य शासनाला विचारुन तुम्ही आम्हाला सांगणार होते.

**मा. आयुक्त :-**

त्या संदर्भामध्ये मी विचारले विचारल्यानंतर ते म्हणाले की, जोपर्यंत शासन मंजुरी देत नाही तोपर्यंत तुम्हाला ठेवायला हरकत नाही.

**जयंत पाटील :-**

शासनाच्या मंजूरीशिवाय तुम्ही त्यांना ठेवू शकत नाही. शासनाने आपल्याला पूर्व मंजूरी दिलेली नाही. फक्त शासनाच्या मान्यतेसाठी आपण पाठवलेले आहे. पूर्व मंजूरी मिळालेली नाही. नाहीतर शासन पूर्व मंजूरी देउ शकले असते. की, आमची पूर्व मंजूरी घ्या. आम्ही जोपर्यंत निर्णय देत नाही तोपर्यंत ते त्या पदावर राहतील. तसा शासनाने तुम्हाला आदेश दिलेला नाही.

**मा. आयुक्त :-**

पुर्व मंजुरीचा अर्थ असा होतो की, सुरुवातीला त्यांची जी नेमणुक केलेली आहे ती, शासनानेच केलेली आहे. ती शासनाच्याच मंजुरीने आपण केलेली आहे. परंतु त्यांना मुदतवाढ देण्याचा जो प्रस्ताव आहे किंवा जी मुदत संपलेली असेल त्याच्या पुढची मुदत रिप्लेस करुन घेण्यासाठी किंवा आणखी चार महिने म्हणा, एक वर्ष म्हणा, सहा महिने म्हणा. तो प्रस्ताव शासनाकडे जर विचाराधीन असेल तर त्याच्यामध्ये आपण काय करणार आहोत आणि कसे म्हणजे आपल्याला जर वेगळे काही वाटत असेल तर आपण त्याबाबतीमध्ये निर्णय घेउ शकता.

**जयंत पाटील :-**

आम्हाला वेगळे वाटण्याचा प्रश्न नाही, प्रश्न नियमांचा आहे. शासनाची मंजुरी घेणे हा नियम झाला. आम्ही मंजुरी दिलेली आहे. महापालिकेस राज्य शासनाचा आदेश मिळाल्यापासुन तीस दिवसांच्या आत महानगरपालीकेने त्याच्या जागी दुस-या व्यक्तिंची नेमणुक केली पाहिजे. दुस-या व्यक्तिची नेमणुक आपण केलेली नाही. एक भाग तो झाला आणि शेवटचे तुम्ही जे सांगता ७ मध्ये जे दिलेले आहे, अशी कोणतीही नेमणुक म्हणजे तुम्ही जी नंतर करणार ती आहे. सहा महिन्याची जी वाढ आहे ती त्यांना दिलेली नाही. साहेब, निट वाचुन घ्या. अशी कोणतीही नेमणुक जी आपण नंतर करणार ती सहा महिन्यापेक्षा जास्त असता कामा नये.

**मा. आयुक्त :-**

परंतु अशी कोणतीही नेमणुक ज्या तारखेस ही जागा रिकामी झाली असेल त्या तारखेपासुन सहा महिन्याहून अधिक मुदतकरिता करता येणार नाही.

**जयंत पाटील :-**

ती नवीन नेमणुक आहे. तुम्ही त्या जागेवर केलेली ती दुसरी नेमणुक आहे. त्या व्यक्तिच्या जागेवर उदा. श्री. घेवारेंच्या जागेवर तुम्ही नेमणूक केली तर ती सहा महिन्यापेक्षा जास्त असता कामा नये. हा त्याचा अर्थ आहे.

**मा. आयुक्त :-**

कलम ७ मध्ये त्याच्या आधी जे पोटकलम आहे, पोटकलम १ किंवा पोटकलम ५ अन्वये नेमणूकीची व्यवस्था होईपर्यंत महापालिकेस एखाद्या व्यक्तीची नेमणूक करुन ती जागा तात्पुरती भरता येईल.

**जयंत पाटील :-**

बरोबर आहे.

**मा. आयुक्त :-**

नेमणूक केलेल्या व्यक्तीला पोटकलम ३ अन्वये त्यावेळेला घोषित केलेल्या कमाल मर्यादेहून अधिक..........

**जयंत पाटील :-**

बरोबर आहे. नवीन नेमणूकीसंबंधी.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला जर असे वाटत असेल की, त्यांची नेमणूक ही नियमाप्रमाणे नाही किंवा त्यांना अजूनपर्यंत मुदतवाढ मिळालेली नसेल. तर त्यांच्यासाठी आपण ...........

**जयंत पाटील :-**

नाहीच आहे. त्यांना मुदतवाढ दिलेलीच नाही. कुठच्याच सभेत मुदतवाढ आलेली नाही. आपण त्यांची मुदत संपण्याच्या अगोदर शासनाकडे पत्र पाठवले की, त्यांना तुम्ही आमच्याकडे परत द्या. आस्थापनेवर

पदनिर्मितीसाठी. परंतु, ते आस्थापनेवर आलेले नाहीत. शासनाने मंजुरी दिलेली नाही. मिन व्हाईल, त्यांनी दिलेल्या परवानग्या, त्यांनी केलेले इतर उद्योग, त्यांनी घेतलेले मानधन, त्यांनी वापरलेल्या गाड्या हा खर्च कोण करणार? ते केबिनमध्ये बसलेले. त्या चार महिन्यात ते केबिनमध्ये बसू शकतात का? याच्यातून अनेक प्रश्न निर्माण होतात. हा घेवारें संबंधी मी सांगत नाही. हे उदाहरण आहे. परंतु, अशा अनेक गोष्टी भविष्यामध्ये घडू शकतात.

**मा. आयुक्त :-**

त्यासाठी आपण काय केले की, त्यांची मुदत संपल्यानंतर शासनाला आपण प्रस्ताव पाठवला.

**जयंत पाटील :-**

ते नियमाप्रमाणे आहे. तो रुटीन भाग आहे. मा. महासभेने शासनाकडे पाठविण्यासाठी मंजुरी दिलेली आणि आपण त्याप्रमाणे केले. पण शासनाने मंजुरी दिलेली नाही. शासनाने मंजुरी का दिलेली नाही हे त्यांना माहिती नाही. पण मिन व्हाईल काय? या चार महिन्यामध्ये त्यांचे पद कुठले? ते महापालिकेत कोण आहेत?

**मा. आयुक्त :-**

याचे आपल्याला असे म्हणता येईल. जोपर्यंत शासनाकडून मान्यता येत नाही तोपर्यंत त्यांची सेवा ही विधीग्राह्य असेल. आपण सेवा घेऊ शकतो.

**जयंत पाटील :-**

कशी ग्राह्य राहील? त्यांना कुठले अधिकार देणार?

**मा. आयुक्त :-**

जोपर्यंत शासन त्याला मान्यता देत नाही तोपर्यंत.

**जयंत पाटील :-**

तोपर्यंत विधी ग्राह्य राहील?

**मा. आयुक्त :-**

शासनाकडे आपण जो प्रस्ताव पाठवलेला आहे. त्या प्रस्तावाला त्यांनी मान्यता द्यायची आहे. मी मान्यता देताना त्यांची जी चार महिन्यापूर्वीची सेवा समाप्त झाली गसेल तर त्या चार महिन्याची युटीलाईज करुन देतील.

**जयंत पाटील :-**

शासनाची मान्यता येऊ द्या. तोपर्यंत बघून घेऊ.

**रोहिदास पाटील :-**

शासनाकडे त्यांना प्रतिनियुक्तीवर पाठवलेले होते. शासनाकडे तो रेकॉर्ड असायला पाहिजे होता की, महापालिकेकडे श्री. घेवारेंना ..........

**मा. आयुक्त :-**

त्यांची मुदत संपल्यानंतर त्यांना मुदतवाढ द्यायला पाहिजे होती.

**रोहिदास पाटील :-**

मुदत संपायच्या आधी दुसरे पत्र यायला पाहिजे होते किंवा ज्याला शासकीय कामकाजात प्रलंबित म्हणतात. तसे एक महिन्याभरात तरी एक पत्र यायला पाहिजे होते की, यांची मुदत संपलेली आहे. पण त्याच दिवसापासून किंवा संपल्यापासूनच्या दुसऱ्या दिवसापासून पुन्हा यांना सहा महिन्यांसाठी, चार महिन्यांसाठी किंवा काय असेल ती मुदतवाढ दिलेली आहे. असे पत्र येणे आवश्यक होते. ते पत्र नवव्या महिन्यापासून आजच्या घटकेपर्यंत आलेले नाही. तीन महिने थोडा उशीर झालेला आहे.

**जयंत पाटील :-**

चार महिने. या नऊ तारखेला चार महिने होतील.

**रोहिदास पाटील :-**

चार महिने पूर्ण झालेले आहेत किंवा त्यांच्याकडून आले नाही. आता आपण जो प्रस्ताव पाठवला हा त्यांच्या नेमणूकीचा निवड समितीने निवड केल्यानंतर तो पाठवलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

तो वेगळा प्रस्ताव आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्यांना मंजुरी देण्याचा विषयच वेगळा आहे. पण शासन दरबाराकडून त्याला मान्यता मिळालेली नाही.

**जयंत पाटील :-**

प्रतिनियुक्तीवर असताना.

**रोहिदास पाटील :-**

त्याला याच्या पुढची वाढीव मान्यता मिळालेली नाही. त्यावेळी जो तांत्रिक प्रश्न उभा राहिला की, त्यावेळी त्यांनी केलेले कामकाज, जसे मागच्या सभेतही आपण बोललो होतो की, हा विषय कुठे नक्की आहे त्याचे सुत्र तुम्ही सांगा. अन्य महापालिकेत चालणारे काम असेल तर ते तरी सांगा. किंवा शासन दप्तरी अशाच परवानग्या दिल्या जातात. असे असेल तर त्याचे एक ठोस उत्तर तुम्ही द्या. हे असे आहे. ह्या महापालिकेत हे असे झाले होते. नसेल तर मग ते नवव्या महिन्यापासून आज ते कार्यरत आहेत. तोपर्यंत

त्यांनी केलेले कामकाज हा प्रश्न बरोबर आहे. ते ग्राह्य की नाही? त्यांनी घेतलेले सर्व भत्ते ग्राह्य किंवा नाही? त्यांची उपस्थिती ज्या ज्या ह्याच्यावर त्यांनी सही केलेली आहे मग आपली सभा असेल, मा. महासभा असेल, त्यांच्या उपस्थितीत त्यांनी दिलेले उत्तर हे ग्राह्य किंवा नाही? गेल्या मा. महासभेमध्ये ते स्वतः बोलायला उभे होते. ते बोलते वेळी आपण त्यांना अलाऊड केले ते कायदेशीर की बेकायदेशीर असा प्रश्न आत्ता इथे उभा राहतो. मग त्यातले नक्की काय? भले पाच मिनिटे तुम्ही आणखी सल्ला घेऊन सांगा पण त्याचे नक्की उत्तर मिळाले पाहिजे ना. आणि ते त्यांच्याच तोंडून मिळाले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये शासनाकडे आपण जो प्रस्ताव पाठवलेला आहे. त्या संदर्भामध्ये त्यांचे असे म्हणणे आहे की, शासन त्याला मान्यता देणार आहे. आणि शासनाच्या मान्यतेस अधिन राहून ते कामकाज करु शकतात. याच्यापूर्वी त्यांचे असे म्हणणे आहे की, आपल्याकडे जे श्री. मनाळे म्हणून सहाय्यक आयुक्त होते. त्यांची मुदत संपल्यानंतर सुद्धा आपण त्यांना दोन महिने इथे ठेवलेले होते. आणि ते शासनाने रेग्यूलराइज करुन दिलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपल्या मुख्यालयाचे पत्र जाणे गरजेचे होते की, तुम्ही प्रतिनियुक्तीवर पाठवलेले श्री. घेवारे ह्यांची मुदत संपलेली आहे. त्यांच्या पुढील कामकाजाबाबत आम्हाला निर्देश व्हावे मार्गदर्शन व्हावे. असे तरी आपले पत्र जायला पाहिजे होते. कायमची नेमणुक हा विषय वेगळा. निवड समितीने निवडला, त्यांनी अर्ज केला हा सब्जेक्टच वेगळा. पण जेव्हा इतक्या मोठया पदाच्या अधिकाराबद्दल त्याची मुदत संपल्यावर ते कार्यरत राहतील की नाही? त्यांना दिलेली देयके त्यांचा दिलेला खर्च त्या हेडखाली केलेला खर्च ग्राह्य की अग्राह्य? हे ठरवायला तुम्ही मार्गदर्शक पत्रतरी जायला पाहिजे होते. म्हणजे आपण हे इजी घेतो असे होते.

**मा. आयुक्त :-**

आपण शासनाकडे प्रस्ताव पाठवलेला आहे.

**जयंत पाटील :-**

प्रस्ताव त्यांना आस्थापनेवर घेण्यासंबंधी आहे. पदनिर्मिती आहे. प्रतिनियुक्तीची वाढ होण्यासाठी नाही.

**मा. आयुक्त :-**

प्रतिनियुक्ती वाढविण्यासाठी प्रस्ताव पाठवलेला आहे.

**जयंत पाटील :-**

ठिक आहे. तुम्ही प्रस्ताव पाठवला असेल त्याबद्दल आम्हाला अविश्वास नाही. परंतु, जोपर्यंत त्यांची प्रतिनियुक्तीवर मुदतवाढ झालेली नाही. तोपर्यंत त्या चार महिन्यामध्ये काय हा आमचा प्रश्न आहे. त्यांनी महापालिकेतील केलेली सर्व कामे वैध ठरतात का? साहेब आपल्या लक्षात येते ना? मग त्यांनी पास केलेले प्लॉन किंवा इतर.

**मा. आयुक्त :-**

तुमचे बरोबर आहे. परंतु त्यांचे असे म्हणणे होते की, जोपर्यंत शासन ज्या तारखेला शासन मान्यता देईल. त्या तारखेला ते मागचे सगळे रेग्यूलाईज करुन देणार.

**जयंत पाटील :-**

कुठल्या नियमाप्रमाणे? तसा नियमच नाही. ते तुमच्याशी फोनवर बोलले. आपल्याला कुठल्याही तऱ्हेचे पत्र आलेले नाही, आदेश आलेले नाहीत.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील साहेब, पहिली गोष्ट म्हणजे की, जसे आपण आत्ता सांगितले तसे त्यांच्या बाबतीमध्ये दोन इश्यू आहेत. एक इश्यू आहे तो नेमणुकीचा इश्यू आहे आणि दुसरा इश्यू आहे तो प्रतिनियुक्तीचा इश्यू आहे. नवीन नेमणुकीच्या बाबतीमध्ये आपण काही बोलतच नाही. प्रतिनियुक्तीच्या बाबतीत आपण म्हणता त्याप्रमाणे जर समजा त्यांची प्रतिनियुक्ती सेवा चार महिन्यापूर्वीच समाप्त झालेली आहे. तर मग जोपर्यंत ते इथे कार्यरत आहेत किंवा त्यांनी कार्यालयीन कामकाज केलेले आहे. आपण म्हणता त्याप्रमाणे त्यांनी गाडया वापरल्या किंवा त्या गाडयांवर जो काही खर्च झालेला आहे तो विधीग्राह्य आहे किंवा नाही. या संदर्भामध्ये आत्ता मी सचिवांच्या पी.ए.शी बोललो, तर त्यांचे असे म्हणणे आहे की, शासन त्याला मान्यता देणार...

**जयंत पाटील :-**

पण साहेब, मान्यता दिलेली नाही ना?

**मा. आयुक्त :-**

दिलेली नाही.

**जयंत पाटील :-**

तेवढेच आम्हाला म्हणायचे आहे.

**मा. आयुक्त :-**

मान्यता आजपर्यंत दिलेली नाही.

**जयंत पाटील :-**

तेच आम्हाला म्हणायचे आहे. हे सगळे मंजूर आहे. देणार कदाचित देणारही नाही.

**हंसूकूमार पांडे :-**

साहेब, मान्यता दिलेली नाही. पण ते काम केले ते वैध आहे की अवैध आहे.

**मा. आयुक्त :-**

नंतर होईल.

**हंसूकूमार पांडे :-**

होईल नाही. जब उनको मंजूरी मिलेगा तभी वह वैध होगा ना? तब तक नया काम चालू है। एन.ओ.सी. हो गया, टी.डी.आर हो गया। इतना प्लॅन पास हो गया।

**मा. आयुक्त :-**

तशी कायद्यामध्ये तरतुद आहे.

**जयंत पाटील :-**

तरतुद नाही. नवीन नेमणूक करायला पाहिजे.कायद्यात हीच तरतुद आहे की, त्या महिन्याभरात तुम्ही नवीन नेमणूक करायला पाहिजे. ते पद तुम्हाला मोकळे ठेवता येणार नाही. या नवव्या महिन्यातच नवीन नेमणूक करायला पाहिजे होती. चार-पाच दिवस वाट बघून.

**रोहिदास पाटील :-**

ते पत्र कधी पाठवले आहे.

**हंसूकूमार पांडे :-**

और आजतक प्लॅन पास करनेका चल रहा है, उसका क्या?

**रोहिदास पाटील :-**

त्यांच्या प्रतिनियुक्तीचे पत्र केव्हा पाठवले याचा खुलासा करा.

**गीता जैन :-**

कल कोई प्लॅन करने आया तो क्या करेंगे? करने का के नही?

**जयंत पाटील :-**

एक उच्च पदावर असलेला अधिकारी त्या ठिकाणी जर कायदेशीर वैधरित्या अधिकारी नाही. तर नवीन नेमणूक व्हायला पाहिजे. नाहीतर महापालिकेचा संपूर्ण कारभार ठप्प झालेला असेल. टी.डी.आर देणे प्लॅन पास करणे ही महापालिकेच्या उत्पन्नाची बाब आहे.

**रोहिदास पाटील :-**

नगररचना म्हणजे अगदी महत्त्वाचे खाते आहे.

**जयंत पाटील :-**

खरे म्हणजे साहेब, ह्या गोष्टीमुळे आपण अडचणीत याल, आम्ही नाही. आम्ही त्यांच्या पदनिर्मितीसाठी मान्यता दिलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

जनरली कसे होते की, शासनाकडे अशा प्रकारचा प्रस्ताव आल्यानंतर शासनाची मंजूरी मिळायला थोडा अवधी लागतो. परंतु, पाठीमागचा जो काही कालावधी आहे. तो कालावधी नियमित करुन देतात हे शंभर टक्के खरे आहे.

**जयंत पाटील :-**

ते बरोबर आहे पण....

**एस. ए. खान :-**

चार महिना हो गया।

**मा. आयुक्त :-**

प्रश्न असा आहे की, जोपर्यंत त्यांचे आदेश आपल्याला प्राप्त होत नाहीत तोपर्यंत काय?

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तोपर्यंत जी मधल्या काळात कामे केली ती वैध की अवैध याचा जरा खुलासा करावा.

**एस. ए. खान :-**

कल कोई कोर्ट मे चला जाये तो प्रॉब्लेम हो जायेगा।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, पण आत्ता काय? आत्ता जर समजा कोणी बिल्डर प्लॅन पास करायला आला. तर त्याचा प्लॅन पास होणार की नाही? समजा, कोणी एखादी एन.ओ.सी. मागितली किंवा आपल्याला टाऊन प्लॅनिंग संबंधी अर्जंट माहिती पाहिजे असेल तर त्याची माहिती आपण कशी घेणार?

**मा. आयुक्त :-**

टाऊन प्लॅनिंग डिपार्टमेंटला त्यांच्या पदाच्या बाबतीत चर्चा सुरु आहे किंवा त्या पदाच्या बाबतीमध्ये साशंका निर्माण झालेली आहे. त्याच्या अगेन्स्ट त्यांच्या असिस्टंटकडून सुध्दा कामे करता येतील.

**रोहिदास पाटील :-**

त्यांना पॉवर डेलिगेट कराव्या लागतील.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील, आपण पॉवर डेलिगेट कधी करतो? जर पूर्ण कामकाज एखाद्याकडून करुन घ्यायचे असेल. परंतु, याठिकाणी आपण संपूर्ण कामकाजाच्या बाबतीत बोलत नाही. सन्मा. सदस्यांनी विचारले याप्रमाणे पर्टीक्युलर जर एखादी महत्वाची एन.ओ.सी. असेल किंवा प्लॅनचे ............

**रोहिदास पाटील :-**

साहेब, अखेर फायनल सही तुमची होते. तेव्हा, पुढील निर्देश येईपर्यंत कामकाज अमुक अधिकारी पाहतील किंवा त्यांनी पहावे, असेतरी निर्देश तुम्हाला द्यावे लागतील. आजच्या सभेला तरी तुम्हाला महत्वाचा निर्णय घ्यायला लागेल. स्थायी समितीमध्ये चर्चा झाल्यानंतर परत ती चर्चा झाली आणि केले असे होणार नाही. तात्पुरता तरी पॉवरचा असा काहीतरी ............

**मा. आयुक्त :-**

थोडा आपण तेवढे करु शकतो. आपण प्लॅन वगैरे थांबवू शकतो.

**हंसुकुमार पांडे :-**

प्लॅन पास झाले त्याचे काय?

**मा. आयुक्त :-**

शासनाची मंजुरी मिळेपर्यंत थांबवू. याबाबत शासनाकडे पत्रव्यवहार केलेला आहे. त्या पत्रव्यवहाराला मंजुरी येईपर्यंत त्यांच्या डिपार्टमेंटला जे कामकाज वगैरे असेल, प्लॅनिंग जे असेल, म्हणजे प्लॅन मंजुर करणे वगैरे ते आपण थांबवून ठेवू.

**हंसुकुमार पांडे :-**

पण साहेब, जे झालेल आहेत त्योच काय?

**मा. आयुक्त :-**

मी मघाशी आपल्याला सांगितले की, जे झालेल असेल, त्यांचा जो कालावधी असेल तो रेग्युलराइज होऊन येईपर्यंत नवीन प्रपोजल जे असतील तर ते आपण थांबवू.

**हंसुकुमार पांडे :-**

लेकिन वह चार महिना जब तक वह वैध नही थे वहॉ बैठने के लिये, उनको बैठने के लिये ऑथोरिटी नही थी, तो उन्होने प्लॅन कैसे पास किया? टी.डी.आर. कैसे दिया? लोगो को एन.ओ.सी. कैसे दिया?

**जयंत पाटील :-**

पोटकलम ७ जो म्हणतोय. नेमणूकीची व्यवस्था होईपर्यंत महानगरपालिकेस एखाद्या व्यक्तीची नेमणूक करुन ती जागा तात्पुरती भरता येईल. कलम ७ वाचा ना.

**मा. आयुक्त :-**

४५ चा ७ असा आहे. पोटकलम १ किंवा पोटकलम ५ अन्वये नेमणूकीची व्यवस्था होईपर्यंत महापालिकेस एखाद्या व्यक्तीची नेमणूक करुन ती जागा तात्पुरती भरता येईल आणि अशा रितीने नेमणूक केलेल्या व्यक्तीला पोटकलम ३ अन्वये त्यावेळी निश्चित केलेल्या कमाल मर्यादेहून अधिक नसेल इतके, महापालिकेस योग्य वाटेल असे मासिक भत्ते व वेतन मिळतील असा निर्देश देण्यात येईल.

**जयंत पाटील :-**

तुम्ही नवीन नेमणूक करा.

**मा. आयुक्त :-**

परंतु, त्याचे जे पद आहे ते सेवाशर्ती नियमांमध्ये पदोन्नतीने आहे की, महापालिकेच्या सेवेसाठी आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तोच एक मोठा विषय आहे की, आपण दि. २९/०४/२००२ चा प्रशासकीय ठराव बघा. त्याच्यामध्ये हे पद आपल्याला प्रतिनियुक्तीवर भरायचे आहे आणि आपण ते सरळसेवेमध्ये भरले आहे. इथे पण गौडबंगाल आहे. म्हणजे महापालिकेने मा. महासभेला माहिती मुळात चुकीची दिलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

आपण जे म्हणता ते ए.डी.पी.टी. च्या बाबतीत म्हणता की, टी.पी. च्या बाबतीमध्ये?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ए.डी.टी.पी. च्या बाबतीमध्ये म्हणतो. प्रशासकीय ठराव असा झाल आहे की, ते पद आपल्याला प्रतिनियुक्तीवर भरायचे आहे आणि आपण ते सरळसेवेने भरलेले आहे आणि मा. महासभेमध्ये आपण ते कायम केलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

एकाकी पद असेल तर आपण सरळसेवेने भरतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही प्रशासकीय ठराव बघा.

**रोहिदास पाटील :-**

आपण ते पत्र केव्हा पाठवले हे तुम्ही मला सांगितले नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. सभापती साहेब, मग त्या चार महिन्याचे काय करायचे?

**मा. सभापती :-**

खुलासा करतात.

**मा. आयुक्त :-**

पत्र दि. २२/१२/२००६ रोजी पाठवले.

**रोहिदास पाटील :-**

दि. २२/१२/२००६ म्हणजे परवाच्या दिवशी.

**मा. सभापती :-**

चार महिने आधी मुदतवाढ घेता. ते सर्व झाले पाहिजे. त्याच्या आधी तुमचे सर्व कंम्प्लीट होऊन आले पाहिजे. नंतर तुम्ही दोन-दोन महिन्याची एक-एक महिन्याची मंजुरी घेता. असा चार्ट तुम्ही तयार ठेवा ना. त्याच्या आधी तुमचा पत्रव्यवहार झाल पाहिजे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

साहेब, मी आणखीन एक गोष्ट लक्षात आणून देतो. मागे टँकरचे कॉन्ट्रॅक्ट दिले पाण्याच्या टाकीवर.............

**रोहिदास पाटील :-**

पण विषयांतर होईल ना.

**तुळशीदास म्हात्रे :-**

हीसुध्दा मुदत संपल्यानंतर चार ते सहा महिने आपण कॉन्ट्रॅक्ट दिले नाही. तर ते चार महिन्याचे पैसे वसुल होणार होते. त्यांच्याकडून. त्योच काय? म्हणजे आपल्या महापालिकेचे ते करोडो रुपयाचें नुकसान झाले. त्या सहा महिन्याच्या कालावधीत रोजचे पैसे वुसल व्हायचे ते कुठे गेले?

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. तुळशीदास म्हात्रे साहेब, तुमचे म्हणणे बरोबर आहे. पण ते नगरपालिकेचे अधिकारी नव्हते. नगरपालिकेच्या ए ग्रेडचा अधिकारी प्लॅन पास कराते. महापालिकेसाठी करोडो रुपयांचे व्यवहार करतो. टी.डी.आर. दिलेले आहेत, केबिनमध्ये बसले, गाड्या वापरत आहेत, मानधन घेत आहेत.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुमच्या मुद्याशी मी सहमत आहे. पण चर्चेला हा विषय असा आहे की, तेव्हा ते नुकसान पण टाळले पाहिजे होते ना. ते पण आपले नुकसान झाले असेल ना? टँकर दोन ते तीन महिने चालले की नाही? मग तिथे रोजच्या रोज लाखो रुपये वसुल होतात ........

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुमच्या कारकिर्दीमध्ये आपण एक ठराव केला की, आपण जे टँकरला पाणी देतो. त्याच्यावर मीटर बसवायचे आणि त्या मीटरप्रमाणे पैसे घ्यायचे. असा आपण ठराव पास केला होता. त्याचे इम्प्लीमेंटेशन अजूनपर्यंत झालेलेच नाही.

**शशिकांत भोईर :-**

ते मीटर पण बसवलेले नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मीटर कुठे बसवले. असेच पाणी भरतात.

**जयंत पाटील :-**

सहाय्यक संचालक, नगररचना स्थापत्य अर्हता दाखवलेली आहे. स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी परिक्षा उतीर्ण. समकक्ष पदवी धारण करणाऱ्या व राज्य शासनाचे सहाय्यक नगररचनाकार या संवर्गातील पदावर दहा वर्षाचा अनुभव. आत्ता श्री. घेवारेंना किती वर्षाचा अनुभव आहे? ते कधी पदवी पास झाले? २००३ साली त्यांनी पदवी घेतली. त्यांना अनुभव आला कुठून?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील साहेब, आपला मुद्दा काय आहे की, हे पद सरळसेवेने आहे की पदोन्नतीने?

**जयंत पाटील :-**

बरोबर आहे. तरीही सांगतो मी, ते ही चुक आहे.

**शशिकांत भोईर :-**

ही सेवाशर्ती बनवली आपण हे वेगळे आहे हा आपला प्रशासकिय ठराव नाही.

**मा. आयुक्त :-**

आपले जर एकाकी पद असेल, एकच जर पद असेल तर ते आपण सरळसेवेने भरतो. त्योच आपण रोस्टर मेन्टेन करतो. ए.डी.पी.टी. चे पद हे प्रतिनियुक्तीने भरले पाहिजे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

२००२ च्या ठरावानंतर हा नियम झालेला आहे आणि हा नियम २००५ मध्ये झालेला आहे. म्हणजे आता ते लागू होईल. त्याच्यामुळे सहाय्यक संचालक या पदाला पालिकेच्या कर्मचाऱ्यांचे पूर्ण नियम लागू होतील. त्याला अजून शासनाने मान्यता दिलेलीच नाही. तो विषय वेगळा आहे.

**जयंत पाटील :-**

पण एक्सपेरियन्स हा तर नियम असणारच. २००३ मध्ये जर डिग्री घेतो तर एक्सपेरियन्स कुठे आला? साहेब, हे अधिकार आपले आहेत. नियमाप्रमाणे आपण चालवायला पाहिजे. आम्ही माहिती विचारलेली आहे. आम्ही चुका दाखवलेल्या आहेत.

**मा. आयुक्त :-**

त्या संदर्भामध्ये मी सांगितले की, त्यांचा जो चार महिन्यांचा कालावधी संपलेला आहे. त्या चार महिन्यांच्या कालावधीमध्ये त्यांनी जे काही काम या ठिकाणी केलेले आहे. तर ते काम रेग्युलराईज होईल किंवा नाही. हा आपला जो प्रश्न आहे त्या संदर्भामध्ये मी आपल्याला एवढे सांगितले की, शासनाकडे आपण त्यांच्या चार महिन्यांच्या मुदतीमध्ये जो काही कामकाज त्यांनी केलेले असेल, मुदतवाढीचा जो प्रस्ताव आहे, शासन त्यांना मान्यता देईल किंवा चार महिन्यांचा जो कालावधी असेल तो त्यांना रेग्युलराईज करुन देईल. आता आपण जर म्हणता की, जोपर्यंत शासनाकडून मंजुरी येत नाही तोपर्यंत नवीन जे काही कामकाज ते आपण थांबवू.

**जयंत पाटील :-**

काम कसे थांबणार साहेब.

**मा. आुयक्त :-**

कामकाज म्हणजे कोणते थांबवणार आपण? संपूर्ण टाऊन प्लॅनिंग डिपार्टमेंटला सिल करतो अशातला भाग नाही. फक्त प्लॅन मंजुरीचे जे काम आहे ते आपण थांबवू. बाकी रुटीनचे जे काम आहे ते दुसरा टी.पी. जो आपला असेल त्यांच्या सल्ल्याने आपण कामकाज करु शकतो.

**जयंत पाटील :-**

पण नियम ७ प्रमाणे आपण नवीन नेमणूक का करत नाही?

**मा. आयुक्त :-**

कशावर?

**जयंत पाटील :-**

४५ च्या ७ प्रमाणे तुम्ही नवीन नेमणूक करा. आपले अधिकारात आपण नविन नेमणूक करा ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांचीच परत नेमणूक करा ना.

**रोहिदास पाटील :-**

ते त्यांचे कामकाज आहे. एक प्रस्ताव गेला त्यांचा. दोन्ही गोष्टीमध्ये पाठपुराव्याचा विषय आहे. एकतर दिरंगाईचा विषय झाला.

**मा. आयुक्त :-**

याचे गांभीर्य आता लक्षात आले. ठिक आहे. मग जो प्रस्ताव आपण पाठवलेला आहे. त्याचा पाठपुरावा करु. पुढच्या स्थायी समितीच्या सभेपर्यंत मंजुर पण होईल.

**जयंत पाटील :-**

तुम्ही शासनाकडे रिक्वेस्ट करणार की, लवकरात लवकर आम्हाला द्या. परंतु, मधल्या काळातील गॅपचे काय?

**मा. आयुक्त :-**

शासन ते रेग्युलराईज करुन देणार ना.

**जयंत पाटील :-**

पण साहेब नियमाप्रमाणे होतच नाही ना. ते नियमातच बसत नाही.

**मा. आयुक्त :-**

मी मघाशी एक उदाहरण सांगितले ना की, श्री. मनाळे साहेबांची मुदत संपल्यानंतर श्री. मनाळे साहेबांना दोन महिने आपण ठेवले. कारण परिवहन सेवा आपली नुकतीच नव्याने सुरु झाली होती. म्हणून त्यांना आपण दोन महिने मुदतवाढ दिली आणि तो दोन महिन्याचा पिरीएड शासनाने आपल्याला रेग्युलराईज करुन दिला.

**जयंत पाटील :-**

आपण त्यांना मुदतवाढ दिलेली होती?

**मा. आयुक्त :-**

कोणाला?

**जयंत पाटील :-**

श्री. मनाळे हयांना...

**मा. आयुक्त :-**

आपण ठरावाने मुदतवाढ दिलेलीच नव्हती.

**जयंत पाटील :-**

इतके महत्वाचे डिपार्टमेंट ए.टी.पी......

**जेन्वी आल्मेडा :-**

ए.टी.पी. नव्याने चालू झालेले नाही. परिवहन नव्याने चालू झालेली म्हणून दोन महिन्यांची मुदतवाढ दिली.

**जयंत पाटील :-**

बरोबर आहे. परिवहन सेवा आपली नव्याने चालू झाली होती. नगररचना हे आजचे नाही. हे नगरपालिका चालू झाल्यापासूनचे आहे.

**मा. आयुक्त :-**

मा.सभागृहाला मी फक्त एवढेच सांगू इच्छितो की, त्यांचा जो काही चार महिन्यांचा कालावधी आहे. त्या चार महिन्यांच्या कालावधी मध्ये त्यांचे जे काही कामकाज झालेले आहे ते कामकाज शासन रेग्युलराईज करुन देणार एवढे मी सभागृहाला आश्वासन देतो.

**जयंत पाटील :-**

कोर्टामध्ये जर चार्जेस झाले तर जबाबदार कोण राहील ?

**मा. आयुक्त :-**

तेच तर सांगतो शासनाने जर मान्यता दिली तर आपली त्याला हरकत राहणार आहे का? शासन मान्यता देणारच आहे. आपल्याला याबाबतीत काय निर्णय घ्यायचा असेल तो घ्या. त्याबाबतीत मी काही आपल्याला म्हणणार नाही.

**जयंत पाटील :-**

विधी सल्लागारांना बोलवा.

**मा. सभापती :-**

तोपर्यंत पुढचा विषय घ्या.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, आता जो त्यांच्यावर खर्च झाला, घेवारे साहेबांवर गाडी वापरली, त्यांना मानधन मिळाले, केबिन वापरली, जो खर्च झाला आहे. त्याच्यावर आपल्या लेखापरिक्षकाचे काय मत आहे. जो खर्च केला तो योग्य की अयोग्य? त्यांनी त्यांचे म्हणणे मांडावे.

**सुरेश बनसोडे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर साहेबांनी जो प्रश्न विचारला. तर याबाबत सहाय्यक संचालक त्यांची वैधता किंवा अवैधता. शासनाकडून निर्णय आल्यानंतर त्यांची नियुक्ती जर वैध झाली तर त्यांच्यावरचा हा खर्च वैद्य राहणार आहे. जर त्यांची परवानगी आली नाही तर तो खर्च अवैध समजून त्यांच्याकडून घेण्यात येईल.

**शशिकांत भोईर :-**

आजची परिस्थिती काय आहे?

**सुरेश बनसोडे :-**

आजच्या परिस्थितीत जोपर्यंत तो निर्णय येत नाही तोपर्यंत त्या खर्चाबाबत मत मांडणे स्पष्ट होत नाही.

**रोहिदास पाटील :-**

उद्या तुम्ही सॅलरी काढणार किंवा नाही? दोन तास हा विषय चालला आहे. तर तुम्ही त्याच्यावर काय करणार?

**सुरेश बनसोडे :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील साहेबांनी जो मुद्दा मांडला त्याच्या हिशोबाने सांगतो की, त्यांची जी वेतन आणि इतर भत्ते आहेत ते जरी महापालिकेने दिले किंवा आपण जरी त्यांना दिले. तर ते वैध राहणार आहेत. कारण हा जो अधिकारी आहे. हा शासनाचा अधिकारी आहे. आणि शासनाचा अधिकारी ज्या ठिकाणी काम करतो त्या ठिकाणचे वेतन त्या ठिकाणची संस्था देणे हे असते.

**शशिकांत भोईर :-**

अहो, मंजूरी दिलेली नाही ना.

**जयंत पाटील :-**

त्यांची मुदत संपलेली आहे हे आपण मान्य करता? चार महिने झाले. बरोबर आहे.

**एस. ए. खान :-**

उनको अभी वेतन मिल रहा है क्या?

**सुरेश बनसोडे :-**

उनको वेतन देना क्रमप्राप्त है। वेतन उनको मिलेगा। जो गाडी का मुद्दा है, उसके बारे मे डिस्प्युट हो सकता है। लेकिन जो वेतन का मुद्दा है, उनको वेतन देना ही पडेगा।

**जयंत पाटील :-**

बनसोडे साहेब, आपल्याला सरळ इथे दिसते आहे की, गेले चार महिने त्यांची मुदत संपलेली आहे. आणि आपण त्यांना मानधन देतो. मानधन देणे हे कायदेशीर नाहीच आहे असे आमचे एक प्रामाणिक मत आहे.

**सुरेश बनसोडे :-**

आपल्या मुद्दयाच्या अनुषंगाने बोलतो. मानधन किंवा त्यांचे वेतन आणि सॅलरी जे आहेत. ह्या ज्या पदाच्या अनुषंगाने ज्या सॅलरीवर समजा, ८०००-१३५०० या सॅलरीचे वेतन ते घेतात. ते शासनाचे नियमित अधिकारी आहेत आणि त्यांना वेतन देणे त्या त्या संस्थेला क्रमप्राप्त असतेच. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे जरी नेमणूक संपलेली असली तरीरेखील काय होते की, शासनाने समजा ..........

**जयंत पाटील :-**

प्रतिनियुक्तीवर एखादा अधिकारी आहे. आम्हाला कळले की, त्यांचे मानधन हा त्यांचा पॉकेटमनी आहे. तो एवढा महत्वाचा भाग नाही.

**सुरेश बनसोडे :-**

माझ्या नियमाच्या अनुषंगाने सांगतो. वेतन आणि भत्ते त्या अधिकाऱ्याला देय होतात.

**जयंत पाटील :-**

प्रश्न आता असा आहे, प्रतिनियुक्तीवर जर मुदत संपली तर त्या अधिकाऱ्याचे वेतन कोणी द्यायला पाहिजे, शासनाने द्यायला पाहिजे.

**सुरेश बनसोडे :-**

मान्य आहे. प्रतिनियुक्तीवर जरी संपली तरी अजून त्याच्यावर निर्णय झालेला नाही.

**जयंत पाटील :-**

कसला निर्णय झालेला नाही. त्यांची मुदत संपलेली आहे ना. आम्ही हेच म्हणतो की, मुदत संपलेली आहे. मुदतवाढ आलेली नाही. नियम ४ काय म्हणतो की, एखाद्या अधिकाऱ्यास पदावरुन काढून टाकण्यात आल्यास महापालिकेस राज्य शासनाचे आदेश मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत महापालिकेने त्या जागी दुसऱ्या व्यक्तीची नेमणूक केली पाहिजे. पाच वर्षानंतर आम्ही या सभेमध्ये येऊन बसू शकतो का? विधी अभियोक्ते काय म्हणतात.

**सई वडके :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलते. ह्याच्यामध्ये प्रकरण ४५ च्या कलम ५ नुसार कोणत्याही पदाची जागा रिकामी झाल्यास ज्या तारखेस ती रिकामी झाली असेल त्या तारखेपासून ४ महिन्याच्या आत किंवा पोटकलम ४ अन्वये एखाद्या अधिकाऱ्यास पदावरुन काढून टाकण्यात आल्यास महापालिकेस राज्य शासनाच्या आदेश मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत म्हणजे आपण २१/१२ ला शासनाकडे पाठवले. मग त्यांनी जर आदेश दिले तर आपल्याला तीस दिवसांच्या आत, जी जागा रिक्त झालेली आहे ती भरुन घ्यावी लागेल.

**जयंत पाटील :-**

मॅडम, आपल्याला प्रश्न कळलेला नाही. आपल्याला प्रकरण काय आहे ते माहित नाही. इथल्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याची जागा दि. ०९/०९/२००६ ला संपलेली आहे. म्हणजे या येणाऱ्या नऊ तारखेला चार महिने पूर्ण होणार. आमचा प्रश्न असा आहे की, त्या काळामध्ये त्यांनी दिलेल्या परवानग्या, त्या काळामध्ये त्यांनी केलेले अधिकृत उद्योग, त्यांनी वापरलेले कार्यालय, त्यांनी घेतलेले मानधन हे वैध आहे का? कारण ते प्रतिनियुक्तीवर आलेले अधिकारी होते. त्यांची मुदत शासनाने घालून दिलेली दि. ०८/०९/२००६ ही मुदत शासनाने घातलेली आणि ती मुदत संपली. त्याच्यानंतर ह्या महापालिकेचे ते कर्मचारी राहू शकतात का? हा आमचा प्रश्न आहे. याबद्दल आपले मत सांगा. आम्हाला हे नियम सांगु नका. हे पुस्तक आमच्याकडे आहे.

**सई वडके :-**

सप्टेंबर २००६ ला जर त्यांची मुदत संपली असेल आणि चार महिन्यांच्या आत आपण जर कार्यवाही केलेली असेल............

**जयंत पाटील :-**

मॅडम, आपल्याला कल्पना नाही. ती मुदत संपल्यानंतर मुदतवाढीसाठी प्रस्ताव आणावा लागतो. प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकाऱ्याची मुदत संपली की, प्रशासनाने स्टँडींगमध्ये मुदतवाढीसाठी प्रस्ताव ठेवावा लागतो. तो ठेवलेला नाही. म्हणजे इथे मुदतवाढ संपल्यामुळे ते आमचे कर्मचारी नाहीत. मग त्यांना आम्ही मानधन देऊ शकतो का?

**सई वडके :-**

साहेब, चार महिन्यांच्या आत आपल्याला शासनाकडून मुदतवाढीचा निर्णय घ्यायचा होता.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, शासन जेव्हा कोणत्याही प्रतिनियुक्तीच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करते. तेव्हा त्याची मुदत तीन वर्षाची, एक वर्षाची की दिड वर्षाची हे शासन ठरवते. तद्नंतर त्याची तारीख संपली. तद्नंतर मा. महासभेपुढे यांच्या मुदतवाढीचा ठराव यायला पाहिजे होता. तसा काही आलेला नाही. तरी त्यांना आपण केबीन दिली, गाडी दिली, काही प्लॅन मंजुर झाले, एन.ओ.सी. दिल्या त्या वैध की अवैध?

**सई वडके :-**

मला तेच म्हणायचे आहे. दि. ०५ सप्टेंबर २००६ ला त्यांची मुदत संपलेली आहे. तर चार महिन्याच्या आत महापालिकेने शासनास मुदतवाढ मागायला पाहिजे होती.

**शशिकांत भोईर :-**

शासनाने असे सांगते की, शासनच त्यांना एक वर्षाची, दिड वर्षाची, तीन वर्षाची मंजुरी देते. शासनाने तीन वर्षाची दिली. नंतर त्यांची मुदत संपली तर आपली महानगरपालिका सहा महिन्याची मुदतवाढ करुन देऊ शकते. असे नियम बोलतो. पण आपल्या मा. महासभेने तशी मंजुरी दिलेली नाही. त्या काळामध्ये त्यांनी ज्या एन.ओ.सी. पास केल्या, प्लॅन पास केले, वेतन घेतले, गाडी वापरली ते वैध आहे की अवैध आहे?

**सई वडके :-**

साहेब, तेच म्हणते. चार महिन्यांच्या आत व्हायला पाहिजे. आपल्याकडे वेळ आहे.

**जयंत पाटील :-**

पण त्यांची मुदतच संपलेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

त्यांची शासनाकडे दिलेली मुदतच संपलेली आहे. शासनाकडे आपण फक्त त्यांची नेमणूक केली ते मंजुरीसाठी पाठवलेले आहे.

**जयंत पाटील :-**

शासनाकडे मंजुरीसाठी पाठवले आहे ते नेमणूकसाठी, आस्थापनेवर घेण्यासाठी पाठवलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, जरा कलम ४५ चा ४ वाचा ना. लॉ ऑफिसर जरा कलम ४ वाचा.

**मा. आयुक्त :-**

शासनाकडून कायम करण्यात आले नसेल. ज्या कोणत्याही अधिकाऱ्याची नेमणूक करण्याचे शासन नाकारेल त्यास ताबडतोब पदावरुन काढून टाकण्यात यावे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बरोबर ना. म्हणजे शासनाने नाकारलेले नाही. मग आपण ह्यांना कसे काढू शकतो?

**मा. आयुक्त :-**

या कलमान्वये केलेली प्रत्येक नेमणूक राज्य शासनाकडून कायम करण्याच्या आधीन असेल आणि ज्या कोणत्याही अधिकाऱ्याची नेमणूक कायम करण्याचे शासन नाकारेल.........

**जयंत पाटील :-**

पण साहेब शासनाने अजूनपर्यंत मंजुरी दिलेली नाही.

**मा. आयुक्त :-**

अधीन असेल असे मी म्हणतो.

**जयंत पाटील :-**

बरोबर आहे. आम्ही एखाद्या अधिकाऱ्याची नेमणूक केली आणि मंजुरीसाठी दिली. तर शासनाने त्याला मंजुरी द्यायला पाहिजे. हा त्याचा अर्थ आहे. शासनाच्या अधीनच राहील. सचिव सोडून बाकीच्या अधिकाऱ्यांच्या नेमणूका त्यांच्या अधीन राहून म्हणजे त्यांच्या परवानगीने हा त्याचा अर्थ आहे. त्यांची परवानगी लागणारच. म्हणजे आम्हाला डायरेक्ट काही करता येणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सभापती साहेब, कृपया आजची सभा आपण तहकुब करा.

**मा. सभापती :-**

सर्व सदस्यांच्या इच्छेनुसार आजची सभा तहकुब करतो.

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- दु. ०२.४५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**